IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# कंटकांजली: एक आधुनिक संस्कृत विडंबन काव्य

**श्री. जयंत विनायक अभ्यंकर**
संस्कृत विभाग
विलिंग्डन महाविद्यालय ( स्वायत्त), सांगली
apjkurdhe@rediffmail.com

**सारांश (Abstract):** *प्राचीन संस्कृत साहित्यात विडंबन (satire) ही शैली दुर्मीळ असली तरी, कंटकांजली हे संस्कृत काव्य आधुनिक काळातील सामाजिक-राजकीय वास्तवाचे चित्रण करून संस्कृतला जिवंत ठेवते. १९६५ साली कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी हे संस्कृत काव्य रचले आहे. या मुक्तक काव्यात स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय भ्रष्टाचार, नोकरशाहीचा अपव्यय आणि सामाजिक ढोंगीपणा यांवर सडेतोड व मार्मिक टीका त्यांनी केली आहे. मानव्यविद्येच्या अभ्यासाच्या उभरत्या सीमांत साहित्य संवर्धनामध्ये (Informative Frontiers of Emerging Trends in Humanities) संस्कृत साहित्य हे केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर समकालीन सामाजिक-राजकीय टीकेचे शक्तिशाली माध्यम आहे. त्या दृष्टीने कंटकांजली हा संग्रह समकालीन संस्कृत साहित्याचा २० व्या शतकातील उत्कृष्ट नमुना आहे.*

*कंटकांजली हे शीर्षक आणि कंटक अर्जुन (किंवा कंटकार्जुन) हे कवीचे नाव हे संस्कृत साहित्यातील विशेषतः विडंबन काव्याच्या दृष्टीने अत्यंत यथार्थ आहे. यामागे खोल विडंबनात्मक (satirical) अर्थ आहे. जिथे सामान्यतः "पुष्पांजली" (फुलांची श्रद्धांजली) दिली जाते, तिथे कवी "काट्यांची अंजली" देतो. म्हणजे समाजातील, राजकारणातील, साहित्यिक वर्तुळातील, मानवी दोष, ढोंग, भ्रष्टाचार, मूर्खपणा या सर्व "काट्यांना" (दुर्गुणांना) कठोर, तिखट, व्यंगात्मक मुक्तकांनी "अर्पण" करणे. हे पूजा नव्हे, तर व्यंग्य प्रहार आहे. कवी स्वतःला "अर्जुन" म्हणवतो, तेव्हा मी समाजातील काटे (दुर्गुण, ढोंगी, भ्रष्ट) मारण्यासाठी धनुष्य उचललेला अर्जुन आहे असे कवीला म्हणावयाचे आहे.*

*या पेपरमध्ये कंटकांजलीचे आधुनिक संस्कृत विडंबन काव्य म्हणून परीक्षण केले आहे, संस्कृतमधील एक वेगळा निर्मितीप्रकार म्हणून या ग्रंथाचा या शोधनिबंधात अभ्यास करणार आहे.*

*या संशोधन पेपरमधील कीवर्ड्स:*

*कंटकांजली – मूळ शीर्षक (काट्यांची अंजली), विडंबन काव्य – व्यंग्य/विनोदी काव्य शैली*

*मुक्तक – स्वतंत्र छोटे काव्य, व्यंग्य – दुर्बलता मार्मिक – नेमकी,चपखल*

*कंटक – काटा, विघ्न, दुर्गुण, क्षुद्र शत्रू , अंजली – श्रद्धांजली, अर्पण (विरोधाभासात्मक वापर)*

**मुख्य शब्द:** कंटकांजली: एक आधुनिक संस्कृत विडंबन काव्य

## I. प्रस्तावना

कंटकांजली हे १९६५ मध्ये कृष्ण श्री. अर्जुनवाडकर (छद्मनाम: कंटकार्जुन) यांनी रचलेले संस्कृत व्यंग्यकाव्य आहे. हे काव्य शार्दूलविक्रीडित वृत्तातील मुक्तक श्लोकांचा संग्रह आहे. १९६० च्या दशकातील भारतीय राजकारण, भ्रष्टाचार, नोकरशाही, सामाजिक ढोंगीपणा आणि योजनांचा अपव्यय अशा अनेक वास्तववादावर कवी विडंबनाच्या माध्यमातून मार्मिक भाष्य करतो.

प्राचीन संस्कृत साहित्यात विडंबन (satire) ही शैली दुर्मीळ आहे. त्यामुळेच या पेपरमध्ये कंटकांजलीचे आधुनिक काळातील संस्कृत भाषेतील विडंबन काव्य म्हणून परीक्षण केले आहे . ज्यामुळे संस्कृत साहित्याच्या पुनरुज्जीवनाला मदत झाली आहे आणि त्याद्वारे संस्कृत साहित्यात एक वेगळा विडंबन काव्याचा नवीन आणि स्वतंत्र काव्य प्रवाह व विचारधारा वाढीला लागली.

## II. भूमिका :-

पुणे येथील संस्कृत विद्वान श्री. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी यांनी कंटकांजली हे काव्य सन १९६५ मध्ये लिहिले. संस्कृत साहित्यातील हा एक नवा प्रवाह असल्याने त्यांनी विडंबन काव्य या प्रकारात हे काव्य लिहिले. त्यासाठी त्यांनी 'कंटकार्जुन' असे

छद्म किंवा टोपणनाव धारण केले. सुमारे १९७ श्लोकांची पद्यरचना यात आहे आणि ती मुखबन्ध , रामराज्यपद्धति , पञ्चशीलपद्धति , धर्मातीतपद्धति, जगदेकराष्ट्रपद्धति,विपाकपद्धति, लोकग्रणीपद्धति, जीवनोद्योगीपद्धति, विद्याविद्यार्थीपद्धति, गार्हस्थ्यपद्धति, तत्त्ववित् पद्धति , अञ्जलिबन्ध अशा बारा विभागांमध्ये विषयानुसार या पद्यरचना विभागल्या आहेत. सर्व पद्यरचना या विडंबनपर आहेत. काव्यातील प्रत्येक श्लोक शार्दूलविक्रीडित वृत्तात लिहिला आहे.

हा ग्रंथ १५ ऑगस्ट १९६५ रोजी अश्वत्थ साहिती, पुणे यांचेद्वारा प्रकाशित झाला. एकूण २५६ पृष्ठांचा हा संग्रह आधुनिक संस्कृत साहित्यात विडंबन (satire), उपरोध (irony), खेळकर विनोद आणि खोचक टीका यांच्या नवीन शैलीसाठी प्रसिद्ध आहे. लेखकाने यात 'कंटक' नावाचे नवीन साहित्यिक रूप (मुक्तक-आधारित व्यंग्य काव्य) संस्कृत साहित्यात स्वतंत्रपणे प्रथमच परिचय करून दिले. ग्रंथातील प्रत्येक मुक्तक आधुनिक जीवनाच्या दोषांवर (राजकीय भ्रष्टाचार, सामाजिक फॅशन, शिक्षणाचे व्यावसायिकरण, धर्मांधता, नातेसंबंधातील ढोंग इ.) खोचक भाषेत टीका करते. या काव्यात' रस मुख्यतः हास्य-व्यंग्य रस, काही ठिकाणी करुण-बीभत्स रसांचे मिश्रण आहे.

आयुष्यातील आलेले व येणारे वेगवेगळे अनुभव कवीने यात काटेरी स्वरुपात आपल्यासमोर ठेवत आपल्या सभोवतालच्या वास्तवावर मार्मिक आणि बोचरी टीका अतिशय नेमक्या शब्दात केली आहे.

## III. साहित्यिक आढावा:

मानवीय अभ्यासाच्या उदयोन्मुख प्रवृत्तींच्या माहितीपूर्ण सीमांतसाहित्यात (Informative Frontiers of Emerging Trends in Humanities) संस्कृत साहित्य हे प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन आणि आधुनिक कालखंडांद्वारे विकसित झालेले आहे, जे प्राचीन वेदिक काळापासून (अंदाजे १५००-२०० ई.पू.) सुरू होऊन, ऋग्वेदासारख्या काव्यसंग्रहांद्वारे धार्मिक आणि दार्शनिक संकल्पना सादर करते, ज्यात उपनिषदे आणि आर्ष महाकाव्ये (महाभारत, रामायण) हे प्राचीन काळातील मुख्य संदर्भ आहेत, जे धार्मिक आणि नैतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करतात आणि वेदांत आणि योगसारख्या संकल्पनांचा पाया घालतात.

मध्ययुगीन संस्कृत साहित्य जे गुप्त साम्राज्याच्या सुवर्णयुगात विकसित झाले, (अंदाजे ५०० ई.पू.-१००० ईस) हा अभिजात (क्लासिकल) काळ म्हणून ओळखला जातो, ज्यात कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतल , ऋतुसंहार सारख्या साहित्याद्वारे काव्य, नाट्य तसेच या काळातील काही दार्शनिक ग्रंथ आणि क्षेमेंद्राचे व्यंग्यकाव्य विकसित झाले. या काळात व्यंग्य आणि सामाजिक टीकेची शैली विकसित झाली, जी गुप्त साम्राज्याच्या सांस्कृतिक वैभवात बहरली आणि ती पर्यावरणीय व नैतिक मुद्द्यांवर प्रकाश टाकते.

अर्वाचीन संस्कृत साहित्य (अंदाजे १०००-१८०० ईस) हा मध्ययुगीन उत्तरार्ध किंवा अपभ्रंश काळ आहे, ज्यात जयदेवासारख्या भक्ती कवींनी गीतगोविंदाद्वारे धार्मिक एकात्मता आणि क्षेत्रीय प्रभाव जोडले, आणि ते ग्रंथ धार्मिक एकात्मता आणि सामाजिक टीका या स्वरुपात विकसित झाले.

आधुनिक संस्कृत साहित्य (१९ -२१ वी शताब्दी) हा संस्कृत साहित्याचा पुनरुज्जीवनाचा काळ आहे, ज्यात कृष्ण अर्जुनवाडकरांच्या कंटकांजलीसारख्या व्यंग्यकाव्यांद्वारे समकालीन राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांचे विडंबन केले आहे. आधुनिक काळात कृष्ण अर्जुनवाडकरांच्या कंटकांजलीसारख्या व्यंग्यकाव्याने स्वातंत्र्योत्तर भारतातील भ्रष्टाचार आणि राजकीय ढोंगीपणावर तीक्ष्ण व मार्मिक टीका केली.

प्राचीन काळापासून विडंबन (satire) ही शैली संस्कृतमध्ये दुर्मीळ असली तरी, ती समाजातील विसंगती उघड करण्यासाठी वापरली गेली आहे. या पेपरमध्ये संस्कृत विडंबन काव्याच्या विकासाचा काही प्रमाणात आढावा घेतला आहे. ज्यात प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन आणि आधुनिक कालखंडांचा समावेश आहे. मुख्य भर कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांच्या 'कंटकांजली' (Ka??akāñjali) वर आहे, जे १९६५ मध्ये प्रकाशित झालेले आधुनिक व्यंग्यकाव्य आहे. हे काव्य शार्दूलविक्रीडित वृत्तातील मुक्तक श्लोकांद्वारे १९६० च्या दशकातील भारतीय वास्तवाचे काटेरी चित्रण करते.

## IV. प्राचीन संस्कृत साहित्यातील विडंबन (Satire in Ancient Sanskrit Literature):

प्राचीन संस्कृत साहित्य हे वेदिक काळातील ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद यांच्यावर आधारित आहे. यात विडंबनाची सुरुवात धार्मिक आणि नैतिक टीकेत दिसते. उदाहरणार्थ, ऋग्वेदातील काही सूक्ते (जसे इंद्र-वरुण संवाद) देवतांच्या मानवी दोषांवर व्यंग्य करतात,तर मण्डूकसूक्तासारखी काही सूक्त उपहासगर्भ सूक्त म्हणूनही पाहिली जातात. बृहदारण्यक उपनिषदासारख्या

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

उपनिषदांमध्ये काही प्रमाणात दार्शनिक विडंबन दिसते, ज्यात गुरु-शिष्य संवादातून अज्ञान आणि ढोंगीपणावर टीका केली आहे. हे विडंबन मुख्यतः नैतिक शिक्षणासाठी वापरले गेले. महाकाव्यांमध्ये (महाभारत आणि रामायण) व्यंग्याचे तत्त्व दिसते. यामध्ये अनेकदा दुर्योधनाच्या अभिमानावर किंवा रावणाच्या अहंकारावर रुपकात्मक पद्धतीने भाष्य केलेले दिसते. हे प्राचीन विडंबन पर्यावरणीय संतुलन (ऋत) आणि मानवी संबंधांवर केंद्रित आहे, परंतू त्यात स्वतंत्र निर्मितीप्रकार म्हणून विडंबन असलेले दिसत नाही. प्राचीन काळातील हे संदर्भ संस्कृत विडंबनाचा पाया घालतात, जे स्वतंत्र काव्यप्रकार म्हणून पुढील कालखंडांमध्ये विकसित झाले.

मध्ययुगीन संस्कृत साहित्यातील विडंबन: (Satire in Middle Ages Sanskrit Literature)
क्षेमेंद्र (११वी शताब्दी) यांच्या 'कलाविलास' आणि 'नर्ममाला' सारख्या ग्रंथांमध्ये दिसते, जी सामाजिक विसंगती, वेश्याव्यवसाय आणि राजकीय ढोंगीपणावर व्यंग्य करते. भल्लट (१०वी शताब्दी) यांचे 'भल्लटशतक' हे मुक्तककाव्य जीवनातील विसंगती उघड करते. कालिदासाच्या 'ऋतुसंहार' मध्येही सूक्ष्म व्यंग्य दिसते, ज्यात निसर्ग-मानव संबंधातील असंतुलनावर टीका आहे. हे या काळातील विडंबन क्षेत्रीय प्रभाव घेऊन विकसित झाले.

## V. अर्वाचीन संस्कृत साहित्यातील विडंबन (Satire in Early Modern Sanskrit Literature)

अर्वाचीन संस्कृत साहित्य (अंदाजे १०००-१८०० ईस) हा मध्ययुगीन उत्तरार्ध आहे, ज्यात भक्ती चळवळ आणि क्षेत्रीय भाषांचा प्रभाव दिसतो. जयदेव (१२वी शताब्दी) यांच्या 'गीतगोविंद' मध्ये धार्मिक विडंबन दिसते, ज्यात राधा-कृष्ण संवादातून मानवी भावनांच्या विसंगतीवर व्यंग्य आहे. हे काव्य सामाजिक एकात्मतेचे प्रतिनिधित्व करते. इतर उदाहरणांत, अप्पाशास्त्री राशिवडेकर (१९०६) यांच्या 'उदरप्रशस्तिः' सारख्या ग्रंथांमध्ये पोटपूजा आणि भ्रष्टाचारावर व्यंग्य दिसते,ज्यात अर्वाचीन काळातील संक्रमण पहायला मिळते. या काळातील विडंबन धार्मिक संतांच्या प्रभावाने (जसे कबीर, तुलसीदास) संस्कृतमध्ये आले, ज्यात प्रकर्षाने सामाजिक टीकेचे नवीन रूप पहायला मिळते. त्यातून आधुनिक काळासाठी विडंबन लेखनाचा पाया भक्कम होताना दिसतो. याशिवाय मन्दस्मितशतकम्- श्रीधर भास्कर वर्णेकर (१९८०-९०) वर्तमान राजकारण, समाज, शिक्षण यांवर भाष्य करणारा हास्यरस प्रधान ग्रंथ तसेच अभिशापशतकम्, विमानशतकम्, सुभाषितोद्धारशतकम् हे अभिराज राजेंद्र मिश्र (१९९०-२०००) यांचे नेते, विमान प्रवासातील विसंगती, सुभाषितांचा दुरुपयोग यांवर भाष्य करणारे शेकडो व्यंग्य मुक्तक श्लोक असलेले ग्रंथ , कपीनाम् उपवासः - शैल ताताचार्य(१९६०)पवित्रतेचे ढोंग, साधू-संन्यासी यांचे ढोंग यांवर भाष्य करणारे छोटे काव्य, सात्विक स्वप्नम् (१०० श्लोक)-पुन्नसेरि नीलकण्ठ शर्मा(१९६७) राजकीय नारेबाजी, नेतांची लोलुपता, राजकारणावर टीका करणारा ग्रंथ, लोकालङ्कार-पङ्कीय- एस. जगन्नाथ(२०००) यांचा सामाजिक ढोंग, आधुनिक जीवन यांवर भाष्य करणारा नवीन व्यंग्य काव्यग्रंथ याशिवाय कवी हर्षदेव माधव, कवी केशवचंद्र दास असे मुक्त छंदातही व्यंग्य दाखवणारे कवी अशा वेगळ्या विचारधारेचे प्रतिनिधित्व करीत आधुनिक काळात विडंबनाच्या माध्यमातून संस्कृत भाषेला विकसित करतात आणि आधुनिकतेकडेही घेऊन जातात.

यामध्ये कृष्ण श्री. अर्जुनवाडकर (१९२६-२०१३) यांचे 'कंटकांजली' हे १९६५ मध्ये प्रकाशित झालेले व्यंग्यकाव्य आहे, ज्यात स्वातंत्र्योत्तर भारतातील करप्रणाली, योजनांचा अपव्यय, भ्रष्टाचार इ.वर मार्मिक व्यंग्य आहे. एकूणच हे सर्व कालखंड एकत्रितपणे संस्कृत साहित्याला मानवीय अभ्यासाच्या उभरत्या सीमांत एक बहुआयामी परिमाण देतात आणि संस्कृत साहित्यात एक वेगळा निर्मितीप्रकार म्हणून विडंबन काव्यलेखनाला प्रेरणा देतात आणि संस्कृत भाषा विकासात हातभार लावतात आणि त्यातून आधुनिक संस्कृत लेखनात नवीन विचारधारा प्रवाहित करतात असे दिसून येते.

**उद्दिष्ट:** कंटकांजलीच्या माध्यमातून संस्कृत साहित्यात विडंबन काव्याचा अधिक चांगला प्रवाह मानवीय अभ्यासाच्या उदयोन्मुख प्रवृत्तींमध्ये (Emerging Trends in Humanities) भर घालतो आणि त्यादृष्टीने संस्कृत विडंबन काव्याला बदलत्या भाषिक प्रवाहात असलेले महत्त्व अभ्यासणे आणि संस्कृतमधील एक वेगळा निर्मितीप्रकार म्हणून कंटकांजलीतील विडंबनाचे स्वरूप, भाषिक वैशिष्ट्ये, सामाजिक टीका यांचे विश्लेषण करून त्याचे परीक्षण करणे हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

**संशोधन पद्धती:** साहित्यिक विश्लेषण (textual analysis), मुक्तक-आधारित उदाहरणे याद्वारे कंटकांजली काव्याचे परीक्षण

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

**विश्लेषण व मूल्यमापन :**

**कंटकांजली (कण्टकाञ्जलिः) ग्रंथातील श्लोक-विश्लेषणः-**

कंटकांजली हा स्वतंत्र मुक्तकांचा संग्रह आहे. मुखबन्ध , रामराज्यपद्धति , पञ्चशीलपद्धति , धर्मातीतपद्धति, जगदेकराष्ट्रपद्धति,विपाकपद्धति, लोकग्रणीपद्धति, जीवनोद्योगीपद्धति, विद्याविद्यार्थीपद्धति, गार्हस्थ्यपद्धति, तत्त्ववित् पद्धति , अञ्जलिबन्ध अशा बारा पद्धतींमध्ये हा ग्रंथ औपचारिकपणे विभागला असला तरी सर्व मुक्तके स्वतंत्र आहेत आणि आधुनिक जीवनातील भ्रष्टाचार, ढोंग, फॅशन, राजकारण, शिक्षण इ. विषयांवर विडंबन करतात. कवीच्या या लेखनावर भर्तृहरि या कवीच्या नीतिशतकाचा प्रभाव अप्रत्यक्षपणे जाणवतो.

**विश्लेषण:**

**(राजकीय भ्रष्टाचारावर विडंबन) :**

इंगजी राजवटीतील राष्ट्रीय भावना उदयाला आली आणि देश पातळीवर अनेक नेते उदयाला आले. त्यावेळचे नेतृत्व हे त्यागमय, देशनिष्ठ आणि देशबांधवांवर प्रेम करणारे होते. लोक त्यांना ईश्वरी अवतार मानत असत. पण पुढे देश स्वतंत्र झाला,नेत्यांच्या कृती,उक्ती,मती भ्रष्ट झाल्या. दुराचार वाढला. हे कवी मार्मिक पद्धतीने लिहितो –

**मूळ संस्कृत श्लोक:**

मन्त्री तस्करमाह कोऽपि, शठ रे! लोकैः श्रमेणार्जितं वित्तं भित्तिविभेदेननेन हरसे, धिक् त्वां जनद्रोहिणम्| पूर्व प्राह परः,कथं जनधनं त्वंभित्तिभेदात् विना गृह्णीषे च, न दण्डयसे च? भगवन्! शिष्योऽस्मि ते, शाधि माम् | कंटकांजली- रामराज्यपद्धति

मराठी भाषांतर:- एक मन्त्री चोराला म्हणाला , लबाड माणसा , लोकांनी कष्टाने मिळवलेला पैसा तू घरफोडी करून लुटतोस? तू जनतेचा शत्रु आहेस. यावर चोर म्हणतो, काय हो , आपण जनतेचा पैसा घरफोडी न करताच लुटता आणि तुम्हाला तरीही शिक्षा होत नाही म्हणजे तुम्ही माझे गुरु आहात आणि मी तुमचा शिष्य. तेव्हा शिकवा मला.

सर्व व्यवस्था कशी भ्रष्ट झाली आहे यावर कवी यामध्ये मार्मिक भाष्य करतो.

१९६० च्या दशकातील कर, महागाई, दमन यांवर कवी तीव्र शब्दात टीकाटिप्पणी करताना म्हणतो-

भ्रष्टाचारावर अश्वत्थ वृक्ष रूपक-

**ऊर्ध्वं मूलमधश्च यस्य वितता शाखाः सुवर्णच्छदः**
**कस्योत्कोचतनुर्जगत्यविदितो यद्यप्यरूपोऽगुणः ।**
**छेत्ता कश्चिदुदेति संसृतितरोश्च्छेत्तास्य वृक्षस्य तु**
**नाभून्नास्ति न वा भविष्यति पुमानश्वथ एषोऽक्षयः ॥ कंटकांजली- रामराज्यपद्धति**

**विश्लेषण:** लाचलुचपत(उत्कोच) हा अदृश्य आणि अक्षय असा अश्वत्थ वृक्ष आहे. ज्याची वर मुळे, खाली सुवर्ण पाने (सोनेरी फायदे) आहेत. रूप-गुण नाहीत, तरी सर्वांना तो माहीत आहे. एकवेळ संसारवृक्ष तोडणारे येतील, पण हा भ्रष्टाचाराचा अश्वत्थवृक्ष कधीच कोणी तोडू शकणार नाही. यात कवीने भ्रष्टाचाराची अमरता दाखवली आहे,ज्याचा अनुभव आजही आपण घेत आहोत.

**मूळ संस्कृत श्लोक:**

**आहृत्य द्रविणं यथाविधि करैः तद् योजनाग्नौ क्षिपन् , अन्नानि क्रशयन् खलांश्च वलयन् गोली-ततीश्-चालयन् । इत्थं पञ्च-मुखः समक्षम् अनिशं लोकान् इमान् संहरन् सर्वस्मात् परतो गलं धरतु मे श्री-सर्वकारो हरः ॥ कंटकांजली – मुखबंध-प्रस्तावना ,मंगलाचरण श्लोक** १

**मराठी भाषांतर:** द्रविणं यथाविधि करैः आहृत्य → कर (टॅक्स) लावून संपत्ती गोळा करणे,तद् योजनाग्नौ क्षिपन् → ती पंचवार्षिक योजनांच्या अग्नीत टाकणे (फुकट जाळणे),अन्नानि क्रशयन् → अन्नाची टंचाई निर्माण करणे,खलान् वलयन् → दुष्ट/भ्रष्ट लोकांना

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

बळकटी देणे,गोली-तती: चालयन् → गोळ्या चालवणे (जनतेवर गोळीबार),पञ्च-मुखः अनिशं लोकान् संहरन् → पाच तोंडाचा (सरकार) सतत जगाचा संहार करत आहे. श्री-सर्वकारो हरः → श्री सरकार हर (शिव)
सर्वस्मात् परतो गलं धरतु मे → माझ्या गळ्यात शेवटी (अखेरच्या) हात घालो (मला शेवटी मारो).

**यातील व्यंग्याचे स्पष्टीकरण:** कवी शिवाचे पाच तोंड (सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान) यांचा वापर करून सरकारला पंचमुखी म्हणतात. शिवाला "हर" (सर्व घेणारा) म्हणतात, त्याचप्रमाणे सरकार (सर्वकार = सर्व घेणारा) सर्व काही घेतो – पैसा, अन्न, नैतिकता, स्वातंत्र्य ! टॅक्स गोळा करून पंचवार्षिक योजनांमध्ये फेकणे → पैशाचा अपव्यय, टंचाई → १९६० च्या दशकातील खाद्य संकट,खलांना (भ्रष्ट नेत्यांना) बळ → भ्रष्टाचार वाढवणे,गोळ्या चालवणे → जनतेवर दडपशाही यांवर हे उचित व्यंग्य अचूक बोट ठेवते.

शेवटी कवी प्रार्थना कर
तो: "हे सरकार-शिवा! तू सगळ्या जगाचा नाश करत आहेस, तरी मला शेवटी मार – म्हणजे मी हे सगळे पाहू नये!"हा श्लोक भर्तृहरिच्या शतक शैलीत लिहिला आहे, पण पूर्णपणे आधुनिक राजकीय व्यंग्य आहे. १९६५ च्या भारतातील नेहरू-इंदिरा काळातील करप्रणाली, योजनांचा अपयश, भ्रष्टाचार आणि दडपशाही यावर यांत सहजपणे केलेली काटेरी टीका आहे. आजच्या काळातही हा श्लोक लागू पडताना दिसतो. जीएसटी, योजनांचा अपव्यय, भ्रष्टाचार, जनतेवर दडपशाही सर्व काही आजच्या काळातही जसेच्या तसे लागू पडते.
(शिक्षण व्यवस्थेवर व्यंग्य)
मूळ संस्कृत श्लोक:

**वर्गे कर्गजसायकैः प्रहरणं कन्याजनत्रासनं**
**तन्निर्वाचनयुद्धकौशलमपि क्रीडांगणे हिंडनम् ।**
**कॅण्टीने वसतिः सिनेगृहरतिस्तद्दीपिकाचर्वणं**
**क्लासोपासनमंततो विफलता विद्यार्थिरामायणम् ॥ कंटकांजली- विद्याविद्यार्थी पद्धति**

**विश्लेषण:** वर्गात कागदाचे बाण मारणे, मुलींना घाबरवणे, निवडणूक लढाई, खेळाच्या मैदानात हिंडणे, कॅन्टीनमध्ये बसणे, सिनेमा बघणे , गाइड चावणे, शेवटी नापास होणे – हे विद्यार्थ्यांचे रामायण!
शिक्षण व्यवस्थेतील व्यर्थता आणि विद्यार्थ्यांच्या कोणत्याही काळी आणि स्थळी कायम दिसत असलेल्या सवयी दाखवत शिक्षण व्यवस्थेचे कधीही न बदलणारे चित्र कवी या विद्यार्थी रामायण म्हणून वर्णन केलेल्या श्लोकातून आपल्याला दाखवतो.
शिक्षक-विद्यार्थी संवाद (उत्तीर्ण होण्यावर)

**शुद्धं वत्स! तवोत्तरं नयनयोः प्रीतिं करोत्यक्षरं**
**पूर्णं चापि विवेचनं नवमपि काप्यस्ति संयोजनम् ।**
**एतावद्धि पुरा मयापि लिखितं नासीत्परीक्षार्थिना**
**सिद्धिर्या तु मयार्जिता तदधिकां मत्तः कथं लप्स्यसे? ॥ कंटकांजली- विद्याविद्यार्थी पद्धति**

**विश्लेषण:** - "मुला, तुझे उत्तर बिनचूक आहे.हस्ताक्षर सुंदर, विश्लेषण पूर्ण आणि नवीन मांडणीसुद्धा आहे. मी परीक्षार्थी असताना असं लिहिलं नव्हतं. तेव्हा मला जेवढे गुण मिळाले होते त्यापेक्षा जास्त गुण मी तुला कसे देऊ?" – परीक्षकाच्या पूर्वग्रह आणि ईर्ष्येची विडंबना या श्लोकातून कवी करताना दिसतो.

**शीलभ्रष्टाचार व्यंग्य :-**

माणूस कसा नीति आणि व्यवहार भ्रष्ट झाला आहे हे सांगताना मानवतेवर कवी सहजपणे टोला लगावतो.

**मूळ संस्कृत श्लोक:**

कर्षेद् यः भुवः पतिः , गृहपतिर्योऽधिष्ठितः केतनं क्रीडेद् यः स पथःपतिः, तरुपतिःशक्तोऽश्मनां क्षेपणे |
खादेद् यः स पतिर्धनस्य च , हरेद् योऽसौ पशूनां पतिः धर्षेद् यः स पतिः स्त्रियो यदिह तत् पूर्णं स्वराज्यं विदुः| कंटकांजली- पञ्चशील पद्धति

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

**विश्लेषण:-** कसेल् त्याची जमीन, राहील त्याचे घर, खेळेल त्याचा रस्ता,दगड मारील त्याचे झाड, खाईल त्याचा पैसा,पळवील त्याची गुरे,भ्रष्टवील त्याची स्त्री हे सर्व म्हणजे परिपूर्ण स्वराज्य होय.

अशाच पद्धतीने अनेकांची वर्तणुक आजही असल्यामुळे त्रासलेला समाज आपल्या आजुबाजुला अजुनही तसाच आहे.त्याचे कारण स्वराज्य या ऐवजी स्वैराचार अधिक विकसित झाला त्यामुळे समाजाला आता तरी विचारप्रवृत्त व्हायला हवे हे या व्यंग्यातून कवीला सुचवायचे आहे.

**धार्मिक भ्रष्टाचार:**

देवदर्शन/मंदिरातील व्यवहार यावर टीका करताना कवी देवाची शुल्कश्रेणी दाखवून म्हणतो जे की आजही प्रकर्षाने जाणवते-

**अक्ष्णैकेन विलोकने दश तथा द्वाभ्यां कृते विंशतिः**
**षष्टिर्गन्धविमर्दने स्रज उरस्याधापने द्वे शते ।**
**शुल्कं रूप्यसहस्रमर्धघटिकाभोगार्थमित्यादिभि-**
**धूर्तैः संप्रति कुट्टनीव्यवसितैर्देवोऽपि वेश्यीकृतः ॥ कंटकांजली- तत्त्ववित् पद्धति**

विश्लेषण: एक डोळ्याने दर्शन १० रुपये, दोन डोळ्यांनी २०; सुगंध लावण्यासाठी ६०, हार घालण्यासाठी २००, अर्ध्या तास भोगासाठी १००० – असे दर ठेवून दुष्टांनी आणि लबाड लोकांनी देवालाही वेश्या बनवले. यातून कवी मंदिरातील व्यावसायिक भ्रष्टाचारावर कटाक्ष टाकतो.

या मुक्तकामुळे आधुनिक समाजातील धर्माचे व्यावसायिकरण कसे झाले आहे हे स्पष्ट होते. आजच्या "मंदिर-राजकारण" यांची एकमेकांशी तुलना करून आपल्याला सामाजिकता स्पष्टपणे जाणवते. त्यामुळे कंटकांजली केवळ हास्यकाव्य नव्हे, तर सामाजिक जागृतीचे साधन आहे, हेही दिसून येते.

यावरून हे लक्षात येते की कंटकांजलीने विडंबनाला केवळ हास्यपूर्ण नाही, तर सामाजिक सुधारणेसाठी 'चिकित्सक' (physician) किंवा 'पोलिस' यांसारखे बनविले.

कंटकांजली" हे शीर्षक आणि "कंटक अर्जुन" (किंवा कंटकार्जुन) हे नाव संस्कृत साहित्यातील विशेषतः विडंबन काव्याच्या दृष्टीने अत्यंत यथार्थ आणि चपखल आहेत. प्रा. के. एस. अर्जुनवाडकर (१९२६-२०२५) यांनी १९६५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या या विडंबन - मुक्तक संग्रहाला "कंटकांजली" नाव दिले आणि स्वतःला "कंटकार्जुन" म्हणवले. यामागे खोल विडंबनात्मक (satirical) अर्थ आहे.

मूळ शीर्षकाची यथार्थता (विडंबन दृष्टीने): कंटक = काटा, विघ्न, त्रास, क्षुद्र शत्रू (संस्कृत/मराठीत नेहमी नकारात्मक अर्थ). अंजली = अंजली (हात जोडून वाहिलेली पूजा, श्रद्धांजली, फुलांची अर्पण). कंटकांजली = "काट्यांची अंजली" किंवा "काटे अर्पण करणे" .

**विडंबनात्मक अर्थ:**

जिथे सामान्यतः "पुष्पांजली" (फुलांची श्रद्धांजली) दिली जाते, तिथे कवी "काट्यांची अंजली" देतोय! म्हणजे समाजातील, राजकारणातील, साहित्यिक वर्तुळातील, मानवी दोष, ढोंग, भ्रष्टाचार, मूर्खपणा या सर्व "काट्यांना" (दुर्गुणांना) कठोर, तिखट, व्यंगात्मक मुक्तकांनी "अर्पण" करणे. हे पूजा नव्हे, तर व्यंग-प्रहार आहे. खूप चतुर आणि दोन-अर्थी शब्दयोजना आहे — वाचकाला लगेच हसू येते आणि विचारही करायला लावते.

"कंटकार्जुन" या नावाची यथार्थता: अर्जुन = महाभारतातील धनुर्धारी, सत्यवादी, युद्धात "कंटक" (शत्रू) मारणारा नायक. कंटक अर्जुन = "काट्यांचा अर्जुन" किंवा "काट्यांना मारणारा अर्जुन" .

**विडंबनात्मक अर्थ:**

कवी स्वतःला "अर्जुन" म्हणवतो, पण तो सामान्य शत्रू नव्हे, तर समाजातील काटे (दुर्गुण, ढोंगी, भ्रष्ट) मारण्यासाठी धनुष्य उचललेला अर्जुन आहे. म्हणजे — "मी फक्त काटे काढणारा/मारणारा अर्जुन आहे, फुलं नाही!"

हे नावही स्वतःवर व्यंग करणारे आहे: मी इतका काटेरी झालोय की माझे नावच "कंटक अर्जुन" झाले!

एकूणच व्यवहारात जाणवलेली एखादी नापसंती किंवा अप्रसन्नता,वास्तव जीवनातली एखादी विसंगती किंवा दांभिकता , आजकालच्या वृत्तपत्रातील वार्तांकनाने बसलेला चटका , विद्यमान समाजातील एखादी अनिष्ट किंवा घृणास्पद घटना अशा गोष्टी

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

मनापासून व्यक्त होणारे विडंबन हे प्रभावी माध्यम असावे असे कवीला वाटल्यामुळे त्या शैलीत या काव्यात प्रभावीपणे लेखन करण्याचा कवीचा हा प्रयत्न खूपच यशस्वी झालेला दिसून येतो.

## VI. मूल्यमापन :

प्राचीन काळात विडंबन मुख्यतः धार्मिक आणि नैतिक मुद्द्यांवर (जसे शतपथब्राह्मणा मधील राजांच्या भेटींवर टीका) होते, मध्ययुगीन काळात ते सामाजिक वर्ग (जसे क्षेमेंद्रच्या ग्रंथांमध्ये कायस्थ आणि ब्राह्मणांवरील व्यंग्य) आणि राजकीय (जसे बिल्हणाच्या विक्रमांकदेवचरितात राजांच्या दुर्गुणांवर) झाले, तर अर्वाचीन काळात ते भक्ती चळवळीशी जोडले गेले (जसे जयदेवाच्या गीतगोविंदात भावनांच्या विसंगतीवर).

कंटकांजलीने हे सर्व एकत्र करून आधुनिक मुद्द्यांवर (जसे भ्रष्टाचार, नोकरशाही आणि सीमांच्या उल्लंघनावर) लागू केले, ज्यामुळे विडंबन काव्याचा प्रवाह अधिक सतत आणि समृद्ध झाला. कंटकांजलीने विडंबन काव्याच्या प्रवाहात अमूल्य योगदान दिले आहे. कंटकांजलीने संस्कृत विडंबन काव्याला अधिक चांगल्या प्रकारे प्रवाहित केले आहे, कारण त्याने आधुनिक वृत्त (शार्दूलविक्रीडित) आणि संरचना वापरून आधुनिक काळातील अनेक वास्तव गोष्टींवर जोरदार टीका केली, ज्यामुळे प्राचीन परंपरा जसे भर्तृहरिच्या शतकत्रयातील जीवन विसंगतीवर व्यंग्य आणि आधुनिक वास्तव यांचा संगम साधला.

हे काव्य केवळ व्यंग्य नाही, तर उद्धरणीय (quotable) श्लोकांद्वारे समाजाला आरसा दाखवते, जे स्वातंत्र्योत्तर भारताच्या मूल्य पतनावर (decline of values) व्यंग्य करून एक नवीन शैली निर्माण करते. यामुळे संस्कृत विडंबनाची परंपरा प्रकर्षाने पुढे आली.

आधुनिक पत्रकारितेमधील महत्त्वाच्या असलेल्या 'संभाषणसंदेश' सारख्या नियतकालिकांनी हे व्यंग्य प्रसिद्ध करून संस्कृतला आणि नवीन काव्य प्रकाराला लोकाभिमुख करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. S.K. De आणि D.D. Kosambi यांसारख्या अभ्यासकांनी आधुनिक काळात संस्कृत विडंबनाची अनुपस्थिती ही एक मिथक आहे असे म्हटले आहे. कारण कंटकांजलीने ती खंडित करून, व्यंग्याला एक सतत प्रवाह दिला.

खरोखर अशाच पद्धतीने अनेक श्लोकात कवीने धर्म , राजकारण , दैनंदिन जीवन यांसारख्या असंख्य क्षेत्रातून कवीने नेमके काटे उचलले आहेत आणि ते नेमक्या शब्दात मांडले आहेत. अगदी चालू काळातील वृत्तिदोष, दृष्टिकोनदोष, कल्पनादोष,समजुतीदोष, वैचारिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक न्यूनता इ.गोष्टी कवीने अगदी रोचक, खोचक, वेचक आणि वेधक पण मार्मिक शैलीत वर्णन केल्या आहेत. कवीचे भाषाप्रभुत्व, सूक्ष्म अवलोकनं, संस्कृतला नवे वळण देण्याची कळकळ या काव्यरचनेतून व्यक्त होते. हे करत असताना कवीने प्राचीन आणि आधुनिक संस्कृत लेखनपरंपरा यांना बेमालूमपणे एकत्र आणले आहे. त्यामुळेच या काव्यात अनेक जुन्या आणि नव्या शब्दांचा सुंदर मिलाप दिसतो. जो की आधुनिक संस्कृतच्या बदलत्या लेखनप्रवाहाला अधोरेखित करतो.

एकूणच, कंटकांजलीने विडंबन काव्याला संस्कृत साहित्यात अधिक चांगल्या तरी प्रवाहित करून, त्याला एक जिवंत आणि प्रासंगिक प्रकार बनवले आहे, जे मानवीय अभ्यासाच्या सीमांत नवीन दृष्टिकोन देते.

## VII. निरीक्षण:

मूळ संस्कृत श्लोक:

**कंटकाञ्जलिः ददाति कण्टकान्, न तु पुष्पाणि।आधुनिके युगे सत्यं कथयति, न मधुरम् ॥**

**मराठी भाषांतर: कंटकांजली काटे देते, फुले नाही. आधुनिक युगात सत्य सांगते, गोड नाही.**

अशाप्रकारे कंटकांजलीने आधुनिक संस्कृत साहित्यात विडंबनाची नवी परंपरा निर्माण केली. संस्कृतला “मृत” भाषा न ठेवता आजच्या समस्या बोलण्यास सक्षम केले हेच या कवीचे संस्कृतसाठी आणि आधुनिक काळात बदलत्या संस्कृत प्रवाहासाठी तसेच नवीन वैचारिक साहित्यासाठी आवश्यक , उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण योगदान आहे. या व्यंग्यकाव्याने या प्रकाराला एक नवीन गती आणि प्रवाह दिला आहे. भविष्यातील संशोधनासाठी हा ग्रंथ आदर्श ठरेल.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

## VIII. निष्कर्ष

१. कंटकांजलीमुळे संस्कृत साहित्यात विडंबन काव्य हा एक नवीन काव्यप्रकार स्वतंत्रपणे विकसित झाला.
२. कंटकांजली काव्याने आधुनिक संस्कृत कवींना अभ्यासाची एक नवीन दिशा प्राप्त करून दिली.
३. कंटकांजली मधून केवळ मराठी किंवा इतर भाषांतच नाही तर संस्कृतमध्येही विडंबन हा साहित्यप्रकार निर्माण होऊ शकतो हे दाखवून दिले.
४. आधुनिक काळात बदलत्या संस्कृत प्रवाहासाठी तसेच नवीन वैचारिक साहित्यासाठी आवश्यक या लेखनातून खूप मोठे योगदान लाभले.
५. प्राचीन संस्कृत लेखनपरंपरा आणि आधुनिक संस्कृत लेखन यांचा सुरेख संगम या काव्यलेखनातून दिसून येतो.
६. या प्रकारच्या संस्कृत काव्यलेखनातून संस्कृत भाषा अधिक समृद्ध , सशक्त आणि प्रवाही झाली.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. अर्जुनवाडकर कृष्ण श्री. , कण्टकांजली , अश्वत्थ-साहिती , पुणे, १९६५ , पुनर्मुद्रण २००८
२. शुक्ल रामचंद्र , आधुनिक संस्कृत साहित्याचा इतिहास , राजकमल प्रकाशन , दिल्ली २००५
३. त्रिपाठी राधावल्लभ, आधुनिक संस्कृत साहित्य का समग्र इतिहास , न्यू भारतीय बुक कोर्पोरेशन , २०१०
४. पांडे मिथिलेश , आधुनिक संस्कृत साहित्य का इतिहास , राधा पब्लिकेशन, दिल्ली,२०१५
५. मराठे हंसश्री , महाराष्ट्राचे ललित संस्कृत साहित्याला योगदान, श्री मंगेश प्रकाशन , नागपूर ,२००६
६. वर्णेकर श्रीधर भास्कर , अर्वाचीन संस्कृत साहित्य ,मॉडर्न बुक स्टोअर्स , अकोला,नागपूर,१९६३
७. https://ia801300.us.archive.org/35/items/kantakanjali/Kantakaanjali.pdf